प्रबोधन
गोरेगाव

# बारावा वार्षिक अहवाल

## १९८३ – ८४

# प्रबोधन गोरेगाव

## १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २५ मे १९८५ रोजी रात्रौ ९ वाजता गणपती भुवन, म. गांधी मार्ग, गोरेगाव (प.), मुंबई-६२ येथील संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१. प्रास्ताविक

२. सन १९८३-८४ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

३. नवीन वर्षाकरिता (१९८४-८५) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

४. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

५. अध्यक्षांचे अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन

**विजय नाडकर्णी**
कार्याध्यक्ष

गोरेगाव मुंबई-६२
दिनांक १४ मे १९८५

**विलास देवरुखकर**
प्रमुख कार्यवाह

---

**विशेष सूचना :** १) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ गणपती भुवन, लो. टिळक नगर रस्ता क्र. ३, गोरेगाव (प.) येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २१-५-१९८५ ते २२-५-१९८५ पर्यंत रोज रात्रौ ८ ते ९ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाहि सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी दिनांक २३-५-१९८५ पूर्वी कार्याध्यक्षांकडे सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २३-५-१९८५ पूर्वी संस्था कार्यालयात रात्रौ ८ ते ९ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन गोरेगाव

## १२ वा वार्षिक अहवाल
## १९८३–८४

प्रबोधन गोरेगाव या संस्थेच्या कार्याचा दि. १ जुलै १९८३ ते ३० जून १९८४ पर्यंतच्या बाराव्या वर्षाचा अहवाल व हिशेब पत्रके आपणांला सादर करताना कार्यकारी मंडळास विशेष आनंद होत आहे.

### कार्यकारी मंडळ आणि सभा :

या अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा घेण्यात आल्या. सभांना सरासरी ११ सदस्य उपस्थित होते. स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाची सभासद संख्या एकूण १८ होती.

### उपक्रम आणि कार्यक्रम :

संस्थेचे हे बाराव्या वर्षातील पदार्पण. एक तपाचा काल सर्वसाधारणतः व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या आयुष्यात मोठा मानला जातो. परंतु संस्थेच्या क्रियाशील कार्यकर्त्यांनी ह्या मोठ्या कालासही आपल्या अथक परिश्रमांनी लहान ठरविले. हा बारा वर्षाचा, एक तपाचा कालखंड ऋतुचक्राप्रमाणे वर्षभर वर्षानुवर्षे सतत सुरू असणाऱ्या कार्यक्रमांमुळे कसा निघून गेला हेच कळले नाही. दर वर्षी एखादा नवा रचनात्मक उपक्रम हाती घेण्याच्या प्रथेस अनुसरून, संस्थेने या वर्षी 'शतपैलू सावरकर' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाने, मराठी सारस्वताच्या सेवेत एक मोलाची भर घातली. संस्था समाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांत नावारूपास तर आली आहेच. पण 'शतपैलू सावरकर' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाने मराठी सारस्वताच्या प्रांगणातही 'प्रबोधन' ने बहुमान प्राप्त केला ह्याचा संस्थेस अतिशय अभिमान वाटतो.

### पुस्तक प्रकाशन–नवीन उपक्रम :

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे महाराष्ट्रीयांचे दैवत. ह्या महाराष्ट्राच्या मृत्युंजय महापुरुषाची यंदा जन्म शताब्दी साजरी करण्यात आली. संस्थेने आपल्या दशवार्षिक महोत्सवात श्री. सुधीर फडके यांच्या 'गीत रामायण' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करून ह्या कार्यक्रमाचे सर्व उत्पन्न 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक निधी'स अर्पण केले होते. तेव्हापासूनच सावरकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त काहीतरी भरीव वा रचनात्मक कार्य करावे असे संस्थेच्या कार्यकर्त्यांस वाटत होते. आणि तसा योग लवकरच आला. निवृत्त प्राध्यापक श्री. ह. त्र्यं. देसाई यांनी अनेक वर्षे अतिशय परिश्रम घेऊन, संदर्भ गोळा करून, ह्या पुस्तकाचे हस्तलिखित तयार केले होते. ते पुस्तक रूपाने छापण्याचा त्यांचा मनोदय होता. 'शतपैलू सावरकर' हे श्री. ह. त्र्यं. देसाई लिखित पुस्तक संस्थेचे प्रथम प्रकाशन म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दीच्या वर्षीच १४ ऑगस्ट १९८३ रोजी माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या हस्ते षण्मुखानंद सभागृह, मुंबई येथे प्रकाशित करण्यात आले.

आपल्या ह्या प्रथम प्रकाशनात संस्थेच्या कार्यकर्त्यांनी एका नव्या जोमाने व उमेदीने काम करून मराठी पुस्तक प्रकाशनाच्या इतिहासात एक नवीनच विक्रम प्रस्थापित केला. पुस्तकाची प्रथम आवृत्ती प्रकाशनपूर्व नोंदणीतच संपून गेली. म्हणून खास लोक आग्रहास्तव दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन विजया दशमीच्या शुभ मुहूर्तावर १६ ऑक्टोबर १९८३ रोजी माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या शुभहस्ते शिवाजीपार्क येथे करण्यात आले.

### प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : (वर्ष ११ वे)

ज्याच्याकडे अतिशय प्रभावी अशी वक्तृत्व कला आहे तो आपल्या कलेने लक्षावधी लोकांना मंत्रमुग्ध करू शकतो, म्हणूनच ज्याच्या अंगी वक्तृत्व कला बाणलेली आहे तो सारे जग जिंकू शकतो, असे

म्हणतात. शालेय त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती व उत्कर्षासाठी सतत जागरूक असणाऱ्या संस्थेने, या वर्षी सातत्याने अकराव्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांवर संस्था महत्व देते हेच दाखवून दिले.

अखिल महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी या स्पर्धेत भाग घेत असल्याने स्पर्धेत खरेखुरे स्पर्धात्मक स्वरूप प्राप्त होते. या वर्षी नाशिक, पुणे, नांदेड इत्यादि दूरवरच्या ठिकाणचे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या स्पर्धेत भाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली हे नमूद करणे आवश्यक आहे. दि. २५ सप्टेंबर १९८३ रोजी पाटकर महाविद्यालयातील सभागृहात विद्यार्थी, पालक, शिक्षक व अन्य रसिकांच्या उपस्थितीत ह्या स्पर्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

बक्षिस समारंभ श्री. द. गो. प्रभु, मुख्याध्यापक, अ. भि गोरेगावकर इंग्लिश स्कूल ह्यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

बक्षिसांचे मानकरी पुढीलप्रमाणे :

**शालेय गट :**

प्रबोधन फिरता करंडक :

सांघिक विजेती शाळा : पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले स्पर्धक : १) निरंजन लिमये २) संदेश जयवंत ३) योगेश पाडगावकर

घोषित विषयावरील स्पर्धा :

प्रथम पारितोषिक रोख रुपये १५०/–
संदेश जयवंत, पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

द्वितीय पारितोषिक रोख रुपये १००/–
निरंजन लिमये, पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

तृतीय पारितोषिक रोख रुपये ५०/–
(रोख रु. २५/– प्रत्येकी विभागून.)
अश्विनी वैलिंग, अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, संजय ओसवाल : जनता विद्यालय, खोपोली.

उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक रोख रुपये ५०/–
विनय भोळे, नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)
द्वितीय पारितोषिक (विभागून रुपये १५/– प्रत्येकी)
सुषुप्ती बनगे, जनता विद्यालय, खोपोली.
राजेश्वरी देशपांडे, अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, पुणे.

**महाविद्यालयीन गट :**

**प्रबोधन फिरता करंडक :**

सांघिक विजेते महाविद्यालय : रुईया महाविद्यालय, माटुंगा

१) श्रुती मराठे २) जयश्री भिडे ३) मिलिंद केणेकर

घोषित विषयावरील स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : रोख रुपये २०० /–
ग. रा. सोनाळे, लॉ कॉलिज, नांदेड.

द्वितीय पारितोषिक : रोख रुपये १५० /–
उपेंद्र किंजवडेकर, लो. टिळक वैद्यकीय महाविद्यालय, सायन.

तृतीय पारितोषिक : रोख रुपये १०० /–
जयश्री भिडे, रुईया महाविद्यालय, माटुंगा

उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : रोख रुपये १०० /–
मिलिंद केणेकर, रुईया महाविद्यालय.
द्वितीय पारितोषिक : रोख रुपये ७५ /–
सुरेश माने, सिद्धार्थ विधी महाविद्यालय, मुंबई.

**प्रबोधन क्रीडा महोत्सव (वर्ष ६ वे)**

७० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतास ऑलिंपिकमध्ये एकही पदक मिळू नये, ही बाब लज्जास्पद तर खरीच, पण त्यासाठी लहान वयातच मुलामुलींच्या अंगात सुप्तपणे असणाऱ्या क्रीडा गुणांना

त्यासाठी वाव दिला पाहिजे या जाणिवेने क्रीडाक्षेत्रात रचनात्मक काहीतरी करावे ह्या हेतूने प्रेरीत होऊन 'प्रबोधन गोरेगाव' ह्या संस्थेने आपला खारीचा वाटा तर निश्चितच उचलला आहे.

मुंबई महानगरी म्हणजे सिमेंट कॉंक्रीटचे जंगलच. त्यात असलेला क्रीडांगणाचा अभाव व क्रीडा हा प्रकार तर फक्त क्रिकेट खेळापुरताच मर्यादित. अशा परिस्थितीत वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शाळांतील मुला-मुलींसाठी तर आपले क्रीडानैपुण्य दाखविण्याची व ते विकसित करण्याची एकही संधी उपलब्ध नव्हती. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणाऱ्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनीही उणीव बरोबर हेरली व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यास सुरूवात केली. ह्या क्रीडा महोत्सवाचे हे ६ वे वर्ष होते.

गोरेगावातील 'निरलॉन' उद्योग संस्था क्रीडा प्रेमाविषयी सर्वश्रुत आहे. या वर्षीचा सहावा प्रबोधन क्रीडा महोत्सव निरलॉन पुरस्कृत होता, हे नमुद करताना संस्थेस अत्यानंद होत आहे. हा क्रीडा महोत्सव 'सिद्धार्थ नगर क्रीडांगण', गोरेगाव येथे १६ ते १८ डिसें० ८३ रोजी पार पडला. चोहोबाजूंनी हवेवर फडफडत असलेल्या निरलॉनच्या रंगीबेरंगी मोठ्या पताका निरलॉन स्टॅन्ड व मैदानाच्या चहू बाजूंनी असलेली पालक, शिक्षक, विद्यार्थी व रसिकप्रेक्षक यांची भरगच्च उपस्थिती, अशा हर्षोत्फुल्ल वातावरणात क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांच्या कवायती पार पडल्यावर प्रबोधनचा क्रीडाध्वज 'निरलॉनचे सेल्स मॅनेजर' श्री सुवर्णा ह्यांच्या हस्ते फडकविण्यातआल्यावर, त्यांनी क्रीडामहोत्सवाचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. याप्रसंगी सादर करण्यात आलेला 'चोगले हायस्कूल बोरीवली' या शाळेच्या लेझिम पथाने व 'समर्थ व्यायाम मंदिरा' च्या भारतीय व्यायाम प्रकारांनी क्रीडामहोत्सवाचे वातावरण एका उच्च तळीवर नेऊन सोडले. त्यानंतर सतत दोन दिवससुरू असलेल्या ह्या क्रीडामहोत्सवात वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील-एकूण ४९ शाळांतील२५०० विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपले क्रीडा नैपुण्य दाखविले. ह्या क्रीडामहोत्सवात धावणे, उंच उडी, लांब उडी, भालाफेक, गोळाफेक अशा वैयक्तिक व कबड्डी व खोखो या सांघिक क्रीडाप्रकारात आपले क्रीडा नैपुण्य दाखविण्याची त्यांना संधी मिळाली. या वेळचा प्रबोधन फिरता करंडक 'विद्यामंदिर दहिसर' या शाळेने पटकाविला. बक्षिस समारंभ क्रीडामहर्षी श्री. यशवंतराव गोळे ह्यांच्या हस्ते पार पडला.

विजेत्या व उपविजेत्या शाळा :

प्रबोधन फिरता करंडक : विद्यामंदिर दहिसर

१) कबड्डी विजेता संघ (मुले) आर. व्ही. टेक्निकल हायस्कूल, खार
कबड्डी उपविजेता संघ (मुले) मरोल प्रागतिक हायस्कूल

२) कबड्डी विजेता संघ (मुली) उत्कर्ष मंदिर, मालाड
कबड्डी उपविजेता संघ (मुली) विद्यामंदिर, दहिसर

३) खोखो विजेता संघ (मुले) विद्यामंदिर, दहिसर
खोखो उपविजेता संघ (मुले) चोगले हायस्कूल

४) खोखो विजेता संघ (मुली) पार्ले टिळक विद्यालय
खोखो उपविजेता संघ (मुली) विद्यामंदिर दहिसर

५) ॲथेलेटिक्स विजेता संघ, सेंट थॉमस हायस्कूल, गोरेगाव
ॲथेलेटिक्स् उपविजेता संघ, जयाबेन खोत हायस्कूल

६) लोकनृत्य विजेता संघ, एअर इंडिया मॉडेल स्कूल
लोकनृत्य उपविजेता संघ, उत्पल संघवी हायस्कूल, जुहू

७) संचलन विजेता संघ, सेंट थॉमस हायस्कूल, गोरेगाव

त्यासाठी वाव दिला पाहिजे या जाणिवेने क्रीडाक्षेत्रात रचनात्मक काहीतरी करावे ह्या हेतूने प्रेरीत होऊन 'प्रबोधन गोरेगाव' ह्या संस्थेने आपला खारीचा वाटा तर निश्चितच उचलला आहे.

मुंबई महानगरी म्हणजे सिमेंट काँक्रीटचे जंगलच. त्यात असलेला क्रीडांगणाचा अभाव व क्रीडा हा प्रकार तर फक्त क्रिकेट खेळापुरताच मर्यादित. अशा परिस्थितीत वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शाळांतील मुला-मुलींसाठी तर आपले क्रीडानैपुण्य दाखविण्याची व ते विकसित करण्याची एकही संधी उपलब्ध नव्हती. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणाऱ्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनीही उणीव बरोबर हेरली व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यास सुरुवात केली. ह्या क्रीडा महोत्सवाचे हे ६ वे वर्ष होते.

गोरेगावातील 'निरलॉन' उद्योग संस्था क्रीडा प्रेमाविषयी सर्वश्रुत आहे. या वर्षीचा सहावा प्रबोधन क्रीडा महोत्सव निरलॉन पुरस्कृत होता, हे नमुद करताना संस्थेस अत्यानंद होत आहे. हा क्रीडा महोत्सव 'सिद्धार्थ नगर क्रीडांगण', गोरेगाव येथे १६ ते १८ डिसेंबर ८३ रोजी पार पडला. चोहोबाजूंनी हवेवर फडफडत असलेल्या निरलॉनच्या रंगीबेरंगी मोठ्या पताका निरलॉन स्टॅन्ड व मैदानाच्या चहू बाजूंनी असलेली पालक, शिक्षक, विद्यार्थी व रसिकप्रेक्षक यांची भरगच्च उपस्थती, अशा हर्षोत्फुल्ल वातावरणात क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांच्या कवायती पार पडल्यावर प्रबोधनचा क्रीडाध्वज 'निरलॉनचे प्लॅन्ट मॅनेजर' श्री सुवर्णा ह्यांच्या हस्ते फडकाविण्यातआल्यावर, त्यांनी क्रीडामहोत्सवाचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. याप्रसंगी सादर करण्यात आलेला 'चोग्ले हायस्कूल बोरीवली' या शाळेच्या लेझिम पथाने व 'समर्थ व्यायाम मंदिरा'च्या भारतीय व्यायाम प्रकारांनी क्रीडामहोत्सवाचे वातावरण एका उच्च तळीवर नेऊन सोडले. त्यानंतर सतत दोन दिवस सुरू असलेल्या ह्या क्रीडामहोत्सवात वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील एकूण ४९ शाळांतील२५०० विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपले क्रीडा नैपुण्य दाखविले. ह्या क्रीडामहोत्सवात धावणे, उंच उडी, लांब उडी, भालाफेक, गोळाफेक अशा वैयक्तिक व कबड्डी व खोखो या सांघिक क्रीडाप्रकारात आपले क्रीडा नैपुण्य दाखविण्याची त्यांना संधी मिळाली. या वेळचा प्रबोधन फिरता करंडक 'विद्यामंदिर दहिसर' या शाळेने पटकाविला. बक्षिस समारंभ क्रीडामहर्षी श्री. यशवंतराव गोळे ह्यांच्या हस्ते पार पडला.

विजेत्या व उपविजेत्या शाळा :

प्रबोधन फिरता करंडक : विद्यामंदिर दहिसर

१) कबड्डी विजेता संघ (मुले) आर. व्ही. टेक्निकल हायस्कूल, खार
कबड्डी उपविजेता संघ (मुले) मरोल प्रागतिक हायस्कूल

२) कबड्डी विजेता संघ (मुली) उत्कर्ष मंदिर, मालाड
कबड्डी उपविजेता संघ (मुली) विद्यामंदिर, दहिसर

३) खोखो विजेता संघ (मुले) विद्यामंदिर, दहिसर
खोखो उपविजेता संघ (मुले) चोगले हायस्कूल

४) खोखो विजेता संघ (मुली) पार्ले टिळक विद्यालय
खोखो उपविजेता संघ (मुली) विद्यामंदिर दहिसर

५) अॅथेलेटिक्स विजेता संघ, सेंट थॉमस हायस्कूल, गोरेगाव
अॅथेलेटिक्स् उपविजेता संघ, जयाबेन खोत हायस्कूल

६) लोकनृत्य विजेता संघ, एअर इंडिया मॉडेल स्कूल
लोकनृत्य उपविजेता संघ, उत्पल संघवी हायस्कूल, जुहू

७) संचलन विजेता संघ, सेंट थॉमस हायस्कूल, गोरेगाव

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा अभ्यास वर्ग :

राष्ट्राच्या उन्नतीसाठी बुद्धीमान व्यक्तींची गरज असल्यामुळे नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग (NCERT) दिल्लीतर्फे प्रतिवर्षी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा ही बुद्धीवान मुलांचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने उपकारकच ठरली आहे. अशा या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक परीक्षेत मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत अल्प असते. ह्याचे कारण अशा परीक्षेबद्दल मराठी मुलांच्या पालकांची ह्या परीक्षेबद्दल असलेली अनास्था व अज्ञान हेच आहे असे संस्थेस आढळून आले आहे. म्हणून अशा परीक्षेची माहिती मराठी पालकांनी घेणे अगत्याचे आहे असे संस्थेस वाटते.

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (NTS) अखिल भारतात वेगवेगळ्या ठिकाणी एकाच दिवशी म्हणजे १ मे रोजी दरवर्षी घेतली जाते.

असे हे राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेचे अभ्यासवर्ग दि. ३ एप्रिल ८४ ते १५ एप्रिल ८४ च्या दरम्यान प्रबोधनच्या नवीन कार्यालयात प्रा. द. वि. बावडे ह्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. ह्या वर्गाचा लाभ ५० विद्यार्थ्यांनी घेतला.

## प्रबोधन बालवाचनालय :

आपल्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांचा एक भाग म्हणून, मुलांवर संस्कार करणाऱ्या उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह असलेली बालवाचनालये प्रबोधनतर्फे ५ ठिकाणी चालविण्यात येतात. त्याचा हजाराहून अधिक शालेय विद्यार्थी लाभ घेत असून सर्व शाखातून तीन हजारहून अधिक उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह आहे.

## प्रबोधन बालवाडी :

समाजाच्या मागासवर्गीय घटकांना उपयुक्त असलेल्या अशा या बालवाड्या प्रबोधनतर्फे जवाहर नगर झोपडपट्टी व तीन डोंगरी झोपडपट्टीत विनामूल्य चालविण्यात येतात. या दोन्ही बालवाड्यात मिळून असलेल्या १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरुपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. त्या बालकांस प्रबोधनतर्फे दिल्या जाणाऱ्या दाखल्यावर त्याला कोणत्याही सरकारमान्य शाळेत प्रवेश मिळू शकतो. अशा विद्यार्थ्यांनी नंतर आपल्या शालेय जीवनात विशेष चमक दाखविल्याचे नजरेस आले आहे. अशा बालवाड्या अधिकाधिक विभागात सुरू करण्याचा संस्थेचा मानस असून त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहे.

## धन्यवाद :

संस्थेने आजवर केलेल्या कार्यात असंख्य हितचिंतकांचा, सभासदांचा व कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकार त्याचप्रमाणे इतर सेवाभावी संस्था ह्यांनी केलेल्या सक्रीय सहकार्यामुळेच संस्थेस येथपर्यंत वाटचाल करणे शक्य झाले आहे. संस्थेचे सरकारमान्य हिशोब तपासनीस मेसर्स एस. एस. नायक आणि कं. व अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. रामचंद्र जोशी यांनी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने या वर्षी संस्थेला रु. ३०,००० चे अनुदान दिले. या उदार मदतीबद्दल संस्था महापालिकेची व अनुदान समितीवरील नगरसेवक सदस्यांची अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे प्रबोधन क्रीडा महोत्सवासाठी निरलॉनने दिलेल्या उदार मदतीबद्दल व रिलायन्स टेक्सटाईल्स या उद्योग समूहाची संस्था अत्यंत ऋणी आहे. ह्यापुढे देखील सर्व संबंधितांचा लोभ सदैव असाच कायम राहील असा विश्वास व्यक्त करीत आहोत.

आपले नम्र,

**कार्यकारी मंडळ (१९८३–८४)**

**प्रबोधन गोरेगाव**

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom 46/72 GB BSD]

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. F 2502 Bom]

( १९८३-८४ )

अध्यक्ष : आमदार श्री. निळकंठ ज. सावंत

उपाध्यक्ष : श्री. प्रभाकर ज. मोडक डी.एम.आी डी.आी.ओ.

श्री. शरद गुप्ते बी. ए.

-: कार्यकारी मंडळ :-

कार्याध्यक्ष : श्री. विजय नाडकर्णी बी.ई. [ऑ.] सिव्हील

प्रमुख कार्यवाह : ,, विलास देवरुखकर बी. एस्सी. [ऑ]

सह कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम.एस्सी , पी एच.डी.

श्री. सुरेश चव्हाण बी. ए.

कोषाध्यक्ष : ,, महादेव खानोलकर

-: सभासद :-

श्री. वसंत तावडे बी. ए.

,, सुरेश सैतवडेकर

,, गणपतराव सारंग जी.डी.आर्ट

,, दिलीप साळवी बी. एस्सी. [ऑ.]

,, सुरेश माईणकर

,, पद्माकर देसाई बी. एस्सी. [ऑ.]

,, नितीन शिंदे

श्री. सुभाष देसाई

,, दिनकर मालवणकर

,, चंद्रकांत ज. सावंत

,, गिरीश देसाई बी. ई.

,, श्रीनिवास शिरसेकर जी डी. आर्ट

ॲड. विकास रेळे बी.ए एल.एल.बी.

अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री. रामचंद्र जोशी बी. ए.

सनदी लेखापाल

मे. एस. एस. नायक आणि कं.

कार्यालय :

गणपती भुवन, लोकमान्य टिळक नगर मार्ग क्र. ३,
महात्मा गांधी मार्ग, गोरेगाव [प.],
मुंबई-४०० ०६२

संपर्क :

रंगसेवा
फिल्मिस्तान जवळ, स्वा. वि. मार्ग,
गोरेगाव [प.], मुंबई-४०० ०६२
दूरध्वनी ६९ ४१ ५७